**महाराष्ट्र शासन**

**शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य,**

**मध्यवर्ती इमारत, डॉ. ॲनी बेझंट मार्ग, पुणे-४११००१.**

## जाहीर प्रकटन,

### इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०२५-२६

सन २०२५-२६ पासून संपूर्ण राज्यामध्ये उच्च माध्यमिक शाळांमध्ये इयत्ता ११ वी चे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन प्रणालीव्दारे सुरु करण्यात आलेली आहे. दिनांक ८ जून २०२५ रोजी अंतिम गुणवत्ता यादी घोषित करण्यात येणार होती त्याऐवजी अंतिम गुणवत्ता यादी दिनांक ११ जून २०२५ रोजी घोषित करण्यात येईल. विद्यार्थ्यांना अर्ज भाग-२ (कनिष्ठ महाविद्यालयांचे प्राधान्यक्रम) भरणेसाठी पूर्वीच्या दिनांक ०२ जून २०२५ रोजीच्या वेळापत्रकामध्ये एक दिवसाचा अधिकचा कालावधी देण्यात आलेला होता. कारण ८४००० विद्यार्थ्यांनी अर्जाचा भाग -१ भरलेला होता पण भाग -२ लॉक केलेला नव्हता. या विद्यार्थ्यांकरीता १ दिवसाचा अधिकचा कालावधी दिनांक ६ जून २०२५ व ७ जून २०२५ रोजी दुपारी १२.३० पर्यतचा वेळ देण्यात आलेला होता.

दिनांक ०७ जून २०२५ रोजीपासून दुपारी १.०० वाजलेपासून तात्पुरती गुणवत्ता यादीवर आक्षेप नोंदविण्यासाठी सुधारित दिनांक ०७ जून २०२५ ते दिनांक ०९ जून २०२५ दरम्यान देण्यात येत आहे. जेणेकरुन तात्पुरत्या गुणवत्ता यादीवरील सर्व आक्षेप नोंदविणे व ते निकाली काढणे यासाठी पुरेसा वेळ मिळेल.

एकंदरीत १२,७१,००० प्राप्त अर्जावर अंतिम गुणवत्ता यादी व्यवस्थापन कोटा, इन-हाऊस कोटा, अल्पसंख्यांक कोटा आणि कॅप राऊंडमधील गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांचे अलोकेशन करण्यास तसेच शाळा महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रवेश निश्चित करणेसाठी पुरेसा वेळ मिळेल याकरीता सोबत सुधारित वेळापत्रक -२ जोडले आहे.

या बाबीची व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात यावी. ही विनंती.

**अधिकृत पोर्टल-** https://mahafyjcadmissions.in

**ई-मेल आयडी** – support@mahafyjcadmissions.in

**हेल्पलाईन नंबर - ८५३०९५५५६४.**

Signed by Shriram Mahadu Panzade
Date: 07-06-2025 19:04:36

(डॉ. श्रीराम पानझाडे)
प्र.शिक्षण संचालक
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)
शिक्षण संचालनालय, म. रा. पुणे

**स्थळ:** पुणे
**दिनांक:** ०७ जून, २०२५

# Directorate of Education (Secondary and Higher Secondary) MS, Pune

## Std.11th CentralizedOnline Admission Process 2025-26

## ADMISSION PROCESS SCHEDULE

support@mahafyjcadmissions.in www.mahafyjcadmissions.in

## Revised 2- on Dated 07/06/2025 ROUND ONE

| Sr. | Date & Time | Centralize Admission Process Details | |
|---|---|---|---|
| 1 | 26 May 2025 11AM to<br><br>**Extension Date 05 June 2025 2:00PM** | **1.ActualStudent registration and online submission of Application with their preferences.**<br>2. Student will be able to enrol a minimum of one and a maximum of ten preferences of Junior Colleges<br>3. Student will get allotment as per their preferences, marks and applicable reservation (if any) given in application form.<br>4. Student can apply online for Quota also simultaneously. (Zero Round for Management/In house/Minority Quota)<br>5.Student should give their consent at every round.<br>6. Non-admitted student can fill, edit their preferences / stream after every round. | **A P P L Y** |
| 2 | **5 June 2025** | **Display of PROVISIONAL GENERAL MERIT LIST** | |
| 3 | 07June 2025 to 09 June 2025 | 1.Submission of Objections / correction requests in the Provisional General Merit List (if any) through "Grievance Redressal" in student login<br>2. Online Redressal of Grievances / Correction requests, by the concerned Deputy Director of Education.<br>3. Finalization of Grievances Redressal by the concerned Deputy Director of Education. | |
| 4 | 11 June 2025 | FINALIZATION OF GENERAL MERIT LIST (One time activity)<br>and Zero Round allocation for Management/ In House/ Minority Quota | |
| 5 | 12 June 2025 to 14 June 2025 | **Zero Round -Quota Admission For**<br>Minority, Quota, In-House Quota, Management Quota at college Level list will provided by department. | |
| 6 | 17 June 2025 | **(CAP Round-1)**<br>Preparation of Merit list of eligible Candidates/allocation.<br>Audit of allocation by the divisional CAP committees. | |
| 7 | 26 June 2025 | **(CAP Round-1)**<br>1. Display of Jr. College Allotment list for The Round on the portal.<br>2. Display of allotted Jr. College details for admission in student login.<br>3. Display of allotted students list to Jr. Colleges.<br>4. Display of cut-off list for the Admission Round. (To be published on Portal.) | |
| 8 | 27 June 2025 to 03 July 2025 | 1. **Students to click (Proceed For Admission) if ok with allotted Junior College**<br>2. **Reporting at allotted collegefor documents verification and payment of prescribed feesetc.& Confirmation of admission in the allotted Junior College by the Student.**<br>3. **If a student doesn't want to take admission in the allotted Junior College should participate in next round.**<br>4. **Admission Confirmation, Rejection & Admission cancellation at College Login.**<br>5. **Student Registration with their preferences filling will continue for new applicant for NEXT ROUND if only consent given by the student.**<br>**Notes** : -<br>• If a student wants to take admission in the allotted Jr. College, then click on **'Proceed for Admission**in Student Login, **upload required documents** and then confirm admission in the allotted Jr. College.<br>• If a student doesn't want to take admission in the allotted Jr. College can wait for further round. BUT<br>• Students who have been allotted to his **first preference**, it is compulsory to take admission in the allotted Jr. College. If such students failed to take admission or been rejected, they will be blocked for a consequent Regular Round 2 to 4 and can only be considered open for all round onwards.<br>• If a student wishes to cancel his/her confirmed admission, can request concerned Jr. College for this and get the admission cancelled. Such students **who have cancelled their admissions** will also be restricted for a consequent Regular Round and can only be considered after the next round. | **A D M I S S I O N** |
| 9 | 5 July 2025 | **Display of vacancy for Regular Round 2 (including Quota seats Jr. Colleges)** | |

**Instructions:**

1. Students who have confirmed their admission in any Jr. College through CAP or QUOTA, the admission process is completed for him/her.
2. Registration fees to be paid via only through Digital Payment modes.
3. Every stakeholder should follow the time limit given (as per schedule) for any activity.
4. Zero Round- forManagement/In-House Quota/Minority Quota admissions will be 12-06-2025 to 14-06-2025.

**(Dr.ShriramPanzade)**
I.C.Director,
(Secondary & Higher Secondary)

# शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा. पुणे.

## इयत्ता ११ वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०२५२६-

## प्रवेश प्रक्रिया वेळापत्रक

ईमेल:support@mahafyjcadmissions.in | संकेतस्थळ:www.mahafyjcadmissions.in

सुधारित २-दिनांक ०७/०६/२०२५ रोजी प्रवेश फेरी क्रमांक एक

| क्र. | दिनांक व वेळ | प्रवेश प्रक्रियेचा तपशील | |
|---|---|---|---|
| १ | २६मे २०२५,सकाळी ११:०० वा.<br>ते<br>मुदतवाढ दिनांक ०५जुन२०२५ दुपारी २.०० वा. | १. प्रवेशासाठी विद्यार्थी नोंदणी व प्राधान्यक्रम निश्चितीसह प्रत्यक्ष अर्ज प्रक्रिया सुरू<br>२. विद्यार्थी त्यांच्या प्राधान्यक्रमाच्या यादीत किमान १ ते कमाल १० उच्च माध्यमिक विद्यालयांचा समावेश करू शकतात.<br>३. अर्जात दिलेल्या पसंती क्रमानुसार आरक्षण, गुण याच्या आधारे प्रवेशासाठी उच्च माध्यमिक विद्यालयाचे वाटप केले जाईल.<br>४. एकाच वेळी विद्यार्थी कोटा अंतर्गत प्रवेशासाठी देखील अर्ज करु शकेल (व्यवस्थापन कोटा, संस्था अंतर्गत प्रवेश कोटा व अल्पसंख्याक कोटा यासाठी शून्य फेरी).<br>५. प्रत्येक फेरीपूर्वी विद्यार्थ्याने संमती नोंदवणे आवश्यक आहे.<br>६. प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना पुढील फेरीत प्रवाह व पसंतीक्रम अद्ययावत करण्याची सुविधा उपलब्ध आहे. | अर्ज |
| २ | ०५ जुन २०२५ | तात्पुरती सर्वसाधारण गुणवत्ता यादी जाहीर करणे. | |
| ३ | ०७ जुन २०२५<br>ते<br>०९ जुन २०२५ | १. तात्पुरती सर्वसाधारण गुणवत्ता यादीबाबत विद्यार्थी त्यांच्या Login मधून *Grievance Redressal* द्वारे हरकती दाखल करू शकतात.<br>२. विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून सदर हरकतींचे ऑनलाईन निराकरण.<br>३. विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून सदर हरकतींबाबत अंतिम निर्णय. | |
| ४ | ११ जुन २०२५ | • अंतिम सर्वसाधारण गुणवत्ता यादी प्रसिद्ध (एकदाच होणारी प्रक्रिया)<br>• शून्य फेरी- व्यवस्थापन कोटा, संस्था अंतर्गत कोटा, अल्पसंख्याक कोटा यासाठी शून्य फेरी अंतर्गत विद्यार्थी/उच्च माध्यमिक शाळा निवड व वाटप | |
| ५ | १२ जुन २०२५ ते<br>१४ जुन २०२५ | **शून्य फेरी**प्रवेश<br>१. व्यवस्थापन कोटा, संस्था अंतर्गत कोटा, अल्पसंख्याक कोटायाअंतर्गत विद्यार्थ्यास मिळालेले उच्च माध्यमिक विद्यालय मान्य असेल तर *Proceed for Admission* वर क्लिक करावे.<br>२. विद्यार्थ्याने आवश्यक कागदपत्रे अपलोड करून व संबंधित उच्च माध्यमिक विद्यालयात जाऊन मूळ कागदपत्रांची पडताळणी करून, विहित शैक्षणिक शुल्क भरून प्रवेश निश्चित करणे. | |
| ६ | १७ जुन २०२५ | कॅप **फेरी**प्रवेश<br>• गुणवत्ता यादी आधारे विद्यार्थी व उच्च माध्यमिक शाळा निवड /वाटप प्रक्रिया,<br>• विद्यार्थी व उच्च माध्यमिक शाळा निवड /वाटप प्रक्रियेचे विभागीय समितीद्वारे परीक्षण. | |
| ७ | २६ जुन २०२५ | **कॅप फेरीप्रवेश**<br>१. प्रवेश फेरीसाठी उच्च माध्यमिक विद्यालय निहाय विद्यार्थी वाटप यादी जाहीर<br>२. विद्यार्थ्यांच्या लॉगीनमध्ये उच्च माध्यमिक विद्यालय वाटप तपशील उपलब्ध होईल. | |

| क्र. | दिनांक व वेळ | प्रवेश प्रक्रियेचा तपशील | |
|---|---|---|---|
| | | ३. उच्च माध्यमिक विद्यालयांना विद्यार्थ्यांचे वाटप यादी प्राप्त होईल<br>४. फेरीनिहाय कट ऑफ-तपशिलाची प्रसिध्दी वेब पोर्टलवर प्रसिध्द केले जाईल. | |
| ८ | २७ जुन २०२५ ते ०३जुलै २०२५ | १. विद्यार्थ्यास मिळालेले उच्च माध्यमिक विद्यालय मान्य असेल तर *Proceed for Admission* वर क्लिक करावे.<br>२. विद्यार्थ्याने आवश्यक कागदपत्रे अपलोड करून व संबंधित उच्च माध्यमिक विद्यालयात जाऊन मूळ कागदपत्रांची पडताळणी करून, विहित शैक्षणिक शुल्क भरून प्रवेश निश्चित करणे.<br>३. विद्यार्थ्यास मिळालेल्या उच्च माध्यमिक विद्यालयात प्रवेश नको असल्यास, पुढील फेरीसाठी संमती देऊन सहभागी होता येईल.<br>४. प्रवेशाची निश्चिती, प्रवेशास नकार व प्रवेश रद्दची नोंद उच्च माध्यमिक शाळेच्या लॉगिनद्वारे केली जाईल.<br>५. नवीन विद्यार्थ्यांसाठी पुढील फेरीतील समावेशासाठी नोंदणी व पसंतीक्रम भरणे हे विद्यार्थ्याने संमती दिल्याच्या अटीवर सुरू राहील.<br>**सूचना :**<br>• जर एखाद्या विद्यार्थ्याला वाटप झालेल्या उच्च माध्यमिक विद्यालयात प्रवेश घ्यायचा असेल, तर विद्यार्थी लॉगिन मधून Proceed for Admission वर क्लिक करावे, आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत आणि त्यानंतर वाटप झालेल्या उच्च माध्यमिक विद्यालयात जाऊन विहित पद्धतीने प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी.<br>• जर एखाद्या विद्यार्थ्याला वाटप झालेल्या उच्च माध्यमिक विद्यालयात प्रवेश घ्यायचा नसेल, तर तो पुढील फेरीची वाट पाहू शकतो. परंतु :<br>• ज्या विद्यार्थ्यांना त्यांच्या पहिल्या पसंतीचे उच्च माध्यमिक विद्यालय प्राप्त झाले आहे, त्यांनी संबंधित विद्यालयात प्रवेश घेणे बंधनकारक आहे.<br>• अशा विद्यार्थ्यांनी जर प्रवेश घेतला नाही किंवा त्यांचा प्रवेश नाकारण्यात आला, तर अशा विद्यार्थ्यांना पुढील नियमित फेरी (Round २ ते ४) साठी अपात्र ठरवले जाईल आणि त्यांना फक्त **सर्वांसाठी खुली फेरी** (Open for All Round) साठीच विचारात घेतले जाईल.<br>• जर एखाद्या विद्यार्थ्याला आपला निश्चित झालेला प्रवेश रद्द करायचा असेल, तर त्याने संबंधित उच्च माध्यमिक हा विद्यालयाकडे विनंती करावी व प्रवेश रद्द करून घ्यावा.<br>• अशा विद्यार्थ्यांना देखील त्या नंतरच्या नियमित फेरीसाठी अपात्र ठरवले जाईल, व ते पुढील फेरीनंतरच प्रवेश प्रक्रियेसाठी विचारात घेतले जातील. | **प्रवेश** |
| ९ | ०५ जुलै २०२५ | फेरी क्रमांक २ साठी रिक्त जागांची यादी जाही करणे (कोटा जागांसह) | |

**महत्त्वाच्या सूचना:**

१. ज्यांनी कोटा किंवा कॅप अंतर्गत संबंधित उच्च माध्यमिक विद्यालयात प्रत्यक्ष प्रवेश निश्चित केला आहे, त्यांच्यासाठी प्रवेश प्रक्रिया पूर्ण समजली जाईल.
२. विद्यार्थी नोंदणी शुल्क केवळ डिजिटल पद्धतीनेच स्वीकारले जाईल.
३. सर्व संबंधितांनी दिलेल्या वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन करावे.
४. शून्य फेरी- व्यवस्थापन, इनहाऊस-, आणि अल्पसंख्याक कोट्यांतील प्रवेश दि. १२ जुन २०२५ ते दि. १४ जुन २०२५ होतील.

**(डॉ. श्रीराम पानझाडे)**
प्र.शिक्षण संचालक,
(माध्यमिक व उच्च माध्यमिक),